# गणेश महासंघाच्या विनंतीवरुन गणेश मंडळासाठी महापालिकेच्या अतिरिक्त करात सवलत

**संभाजीनगर ( ता.१० ) :** गणेशोत्सव काही दिवसावर येऊन ठेवला असता विविध परवानगी, शुल्क आदिंसाठी महापालिका, महावितरण, पोलीस यांच्यावतीने एक खिडकी योजना राबवली जात आहे. परंतु महापालिका स्टेजसाठी २०० ते ४०० प्रतिदिन भाडे आकारल्याने ४ ते ५ हजार भाडे विनाकारण आकारले जात होते. यांची तात्काळ दखल घेत गणेश महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित ठिकाणी भेट देऊन महापौर, उपमहापौर व अन्य पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन फक्त ५०० रु मध्ये सर्व परवानगया देण्याचे मान्य केले.

महासंघाच्या प्रयत्नामुळे शहरातील गणेश मंडळांना मोठा दिलासा मिळाला. महापालिकेत आज सायंकाळी ५ वाजता झालेल्या बैठकित महापौर त्र्यंबक तपु, उपमहापौर प्रमोद राठोड, स्थायी सभापती दिलीप थोरात, गणेश महासंघाचे संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराज पवार, अध्यक्ष संजय बारवाल, कार्याध्यक्ष नंदकुमार घोडेले, नगरसेवक ऋषिकेश खैरे, विजय वाघचौरे, संदिप शेळके, कॅप्टन विनोद नरवडे, सचिन खैरे, नारायण कानकाटे, अनिल मानकापे, अनिकेत पवार आदिंसह मनपा अधिकारी व गणेश महासंघाचे पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

**प्रसिध्दीप्रमुख**

**गणेश वाघ/ मनोज वडगावकर**